“ **<u>प्रेस नोट</u>** ” **दिनांक - १५/१०/२०२६**

**: मुंबई पोलीसांची यशस्वी कामगीरी :**

**गोणीमध्ये बांधुन समुद्रात टाकलेल्या अनोळखी इसमाच्या खुनाचा क्लिष्ट गुन्हा उघडकिस आणलेबाबत.**

दि.०१/१०/२०२६ रोजी सकाळी ०८:४५ वा.चे सुमारास वर्सोवा पोलीस ठाण्याच्या हददीत समुद्र किनाऱ्यावर, देवाची वाडी (वर्सोवा) अंधेरी (प), मुंबई येथे गोणीमध्ये अनोळखी इसमाचा मृतदेह मिळुन आला होता. या बाबत वर्सोवा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१२९८/२६, कलम १०३(१), २३८ भा.न्या.सं.गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन उत्तर परिमंडळ १ हददीतील सर्व पोलीस ठाणेचे सहा पथके स्थापन करून मयताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू केले.

या सर्व तपास पथकाने अहोरात्र अथक परिश्रम करून वेगवेगळया भागामध्ये शोध मोहिम राबवली. यासाठी गोपनिय बातमीदार यांचीही मदत घेण्यात आली. यादरम्यान मिळालेल्या गोपनिय माहितीवरून मयत इसमाचे नाव बसंतलाल सुकदेव कोरी असे निष्पण्ण झाले. यामध्ये तपास पथकांनी आणखी शोध घेतला असता मयत इसम हा संतोष मिश्रा याचेकडे मालाड पश्चिम या ठिकाणी भाजीविक्री चे काम करत असल्याचे माहिती मिळाली. त्यानुसार संतोष मिश्रा यांचा शोध घेतला असता सदर इसम संतोष मिश्रा त्याचे कुटूंबातील सर्व सदस्यासह त्यांचे राहते घरातुन निघुन गेल्याचे निष्पण्ण झाले. तसेच त्याचे दुकानात काम करणारे इतर कर्मचारी हेही मुंबई चे बाहेर निघुन गेल्याचे निष्पण्ण झाले.

त्यानुसार मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार दोन तपासी पथके हे उत्तर प्रदेश येथे सदर आरोपीचे शोध घेणेकामी दि. ०६/१०/२०२६ रोजी पाठविण्यात आले. त्यांनी तेथे अथक परिश्रम व गोपनिय माहितीव्दारे तसेच स्थानिक पोलीस ठाणेचे मदतीने दि. ०७/१०/२०२६ रोजी जुगराज यादव या आरोपीस अटक केली व सदरचा अवघड व गंभीर गुन्हा उघडकीस आणला.

सदर गुन्हयातील आरोपीतांनी मयत इसम यास पुर्वीच्या भांडणाच्या रागातुन त्याच्या डोक्यात गंभीर दुखापत करून ठार करून मृतदेहाची विल्हेवाट लावण्याकरीता गोणीमध्ये बांधुन समुद्रामध्ये टाकले व नमुद आरोपीतांनी वेगवेगळया राज्यामध्ये पलायन केले होते.

मुंबई गुन्हे शाखा युनिट ०९ यांचे पथकाने यातील संतोष मिश्रा व इतर आरोपींना दिनांक १३/१०/२०२६ रोजी शोध घेवुन वर्सोवा पोलीस स्टेशनचे ताब्यात दिले आहे. सदर गुन्हयात अदयापपावेतो सहा आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपीचे नावे

१) जुगाराज रामनाथ यादव, वय ५९ वर्षे, २) संतोष वृदावन मिश्रा, वय ६५ वर्षे, ३) शिवम संतोष मिश्रा, वय २७ वर्षे, ४) श्रीमती मिरा संतोष मिश्रा, ५६ वर्षे, ५) कु. अंजू संतोष मिश्रा, वय ३४ वर्षे. ६) कु. वंदना संतोष मिश्रा, वय २९ वर्षे.

सदरची यशस्वी कामगिरी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई शहर, श्री. देवेन भारती, मा. श्री मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त ( का व सु ),मा. श्री. शशीकुमार मिना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, श्री पुरूषोत्तम कराड, पोलीस उपायुक्त, उत्तर परिमंडळ-१ यांचे मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर आवारी (वर्सोवा विभाग, मुंबई), वर्सोवा पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्रीमती. दिपशिखा भाग्यश्री आव्हाड वारे, पो.नि. (प्रशासन) अमर ढेंगे, स.पो.नि सुचिता देशमुख, पो.उ.नि कोळी (मालाड पोलीस ठाणे) पो.उ.नि अमर शिंदे (मालाड पोलीस ठाणे) तसेच वर्सोवा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी / अंमलदार पो.उ.नि प्रशांत कांबळे, पो.उ.नि विशाल दौंडकर, पो.ह.संदिप महाडेश्वर, पो.ह गणेश गांगुर्डे, पो.ह पाडूरंग पवार, पो.ह अमित चव्हाण, पो.ह भावसार, पो.शि किशोर सातपुते, पो.शि राजेश वन्नम, पो.शि प्रविण जाधव, पो.शि सागर कोयंडे, पो.शि.विराज भोईर, पो.शि मनोज काळे, पो.शि मनोज परदेशी, मालाड पोलीस ठाणेचे पो.ह.संतोष सातवसे, पो.शि अविनाश जाधव , पो.ह. विवेक तावडे व मुंबई गुन्हे शाखा युनिट ९ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.